महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित

**लोकनेते व्यंकटराव हिरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय**

पंचवटी नाशिक - ४२२००३

पुणे विद्यापीठ संलग्न क्र पी.यू./एन.एस/ए.एस.सी/०१८(१९७१)

(NAAC Reaccredited at ‘**A**’ Level with CGPA 3.01)

कार्यालय: २५१२९५४ , २६२८२३३ फैक्स ( २५३) २५१२९२४

Web site : www.lvhcollege.com * E-mail: lvhcollege@gmail.com,

उत्कृष्ट संलग्न महाविद्यालय पुरस्कार २०१७, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Founder



Karmaveer
Bhausaheb Hiray

दिनांक २८/०३/२०१८

# ग्रंथालय वार्षिक अहवाल २०१७-१८

**ग्रंथालयाविषयी माहिती:-** ग्रंथालयात कला, वाणिज्य, विज्ञान आणि बी. व्होकेशनल विषयावरील पुस्तके, आत्मचरित्रे, धर्मकोश, विश्वकोश इअरबुक, डिक्शनरी, निरनिराळया विषयावर ग्रंथ उपलब्ध आहेत. ग्रंथालयात पुस्तकांबरोबरच मासिके, नियतकालिके आणि जर्नल्स उपलब्ध आहेत. तसेच स्पर्धा परीक्षा पुस्तकांचा स्वतंत्र विभाग आहे. बदलत्या काळानुसार ई जर्नल्स ई पुस्तके देखील उपलब्ध आहेत. गरीब विद्यार्थ्यांसाठी बुक बँक सुविधा दिली जाते. मुला मुलींसाठी वेगळी अशी वाचन व्यवस्था आहे. दरवर्षी ग्रंथालयात पुस्तकांचे प्रदर्शन भरविले जाते. ई रीडिंग आंतर ग्रंथालय देवघेव सेवा ग्रंथालयात उपलब्ध आहेत.

यावर्षी भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालय विभागाच्या केंद्रीय हिंदी निदेशालया कडून २०० पुस्तके भेट स्वरूपात मिळाली. ग्रंथालयात एकूण ग्रंथसंपदा ६७ हजार २९७ इतकी आहे. त्यापैकी २०१७-१८ वर्षात माहे मार्च पर्यंत वरिष्ठ महाविद्यालयासाठी १८०३ पुस्तके खरेदी करण्यात आली. त्याची एकूण किमत ८,५६,८८५/- इतकी आहे. महाविद्यालय स्तरावर होणाऱ्या वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, सामान्य ज्ञान स्पर्धा, स्पर्धा परीक्षा तसेच व्यायावसायिक मार्गदर्शन इत्यादी मध्ये भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ग्रंथालयामार्फत मार्गदर्शन व संदर्भ सेवा दिली जाते.

**ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या वाचन साहित्याचा तपशिल.**

| अ.नं. | विवरण | मागील ग्रंथांची संख्या | चालू वर्षातील वाढ | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | विकत घेतलेली ग्रंथ | | | |
| | १.वरिष्ठ विभाग | ४७२९४ | १५३२ | ४८८२६ |
| | २. वरिष्ठ पी.बी.एफ. | ६७६२ | २९४ | ७०५६ |
| | ३.कनिष्ठ विभाग | १४२१५ | २७ | १४२४२ |
| | ४. कनिष्ठ पी.बी.एफ.. | ४८५९ | | ४८५९ |
| | ५.व्यवसाय शिक्षण विभाग आणि इतर | १०७७३ | | १०७७३ |
| | ग्रंथसंख्या | ८३९०३ | १८५३ | ८५७५६ |
| २ | प्रबंध व लघुप्रबंध | ०४ | १ | ०५ |
| ३ | नियतकालिकांचे बांधीव खंड | ५५७ | - | ५५७ |
| ४ | सीडी व डीव्हीडी | २४० | ०५ | २४५ |
| | एकूण | ८०१ | ०६ | ८०७ |
| ५ | रद्दबातल ग्रंथसंख्या<br>१. वरिष्ठ विभाग<br>२. वरिष्ठ पी.बी.एफ. | ४१६१ | - | ४१६१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ३. कनिष्ठ विभाग<br>४. कनिष्ठ पी.बी.एफ..<br>५. व्यवसाय शिक्षण विभाग आणि इतर | १४६८<br>३४९९<br>२८२४<br>०२ | -<br>-<br>-<br>- | १४६८<br>३४९९<br>२८२४<br>०२ |
| ६ | इतर (बुक बँक/ गुणवत्ता विकास / कनिष्ठ एस. अे. एफ./ वरिष्ठ एस. अे. एफ./ एम. एस.डब्लू / के.बी.एच.इजिनि./ व्यवसाय शिक्षण मार्गदर्शन कोर्स ) | ६४५५ | -<br>- | ६४५५ |
| | एकूण | **१८४०९** | **-** | **१८४०९** |
| **ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या ग्रंथांची संख्या** | | **६७३४७** | | |
| ७ | नियतकालिके<br>१. वर्गणीतून खरेदी केलेली<br>२. ई-जर्नल्स<br>३. ई-बुक्स | १०२<br>२१००<br>५१००० | ०३<br>३९००<br>४६००० | १०५<br>६०००<br>९७००० |

**ग्रंथालयातील सभासद संख्या**

| अ.नं. | ग्रंथालयातील सभासद संख्या | विद्यार्थी | शिक्षक | |
|---|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ विभाग ( अनुदानित आणि विनाअनुदानित) | ३००१ | ७२ | |
| २ | वरिष्ठ विभाग (विनाअनुदानित) पदव्युत्तर सत्र | ७३३ | | |
| ३ | कनिष्ठ विभाग ( अनुदानित आणि विनाअनुदानित) | १४४४ | ३० | |
| ४ | शिक्षकेत्तर कार्मचारी( अनुदानित आणि विनाअनुदानित) | | ६२ | |
| | **ग्रंथालयातील एकूण सभासद संख्या** | ५१७८ | १६४ | |

**माहिती साक्षरतेचा उपक्रम :** माहिती तंत्रज्ञानाच्या युगात माहिती ही विविध स्वरूपात मुबलकपणे उपलब्ध होत आहे. त्या माहितीच्या प्रवाहातून नेमकी माहिती मिळविणे व ती योग्य प्रकारे वापरणे, यासाठी विशेष कौशल्याची गरज भासत आहे. अशा माहितीच्या बाबतीत चौकस असणे, साक्षर असणे गरजेचे झाले आहे. त्या उद्देशाने महाविद्यालयाचा विद्यार्थी माहिती साक्षर व्हावा यासाठी ग्रंथालयात डॉ. एस. आर. रंगनाथन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मदिनी ग्रंथप्रदर्शन भरविण्यात आले.

**इंटरनेट सेवा :** ग्रंथालय विभागात १० संगणकासह इंटरनेट सुविधा असलेली सुसज्ज प्रयोगशाळा ई-रिसोर्स च्या वापरासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी संशोधक व प्राध्यापक लाभ घेतात.

**पी.बी.एफ. :-** आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थासाठी ग्रंथपेढी पी.बी.एफ. या योजने अंतर्गत ३९४२५.०० रू. किमतीचे सुमारे २९४ ग्रंथ खरेदी करण्यात आले. या योजनेतील ९० विद्यार्थाना ३१० पुस्तके वर्षभर घरी अभ्यासासाठी देण्यात आली.

**स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र** : महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातून शैक्षणिक वर्षात स्पर्धा परीक्षेची ५५८ पुस्तके विद्यार्थ्यांना वर्षभरासाठी पुस्तके देण्यात आली. १८६ विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घेतला.

**नियतकालिके :** विविध विषयावरील ग्रंथसंख्या हे जसे ग्रंथालयातील महत्वाचे अंग आहे. त्याच प्रमाणे नियातकालिके सुद्धा ग्रंथालायाचे महत्वाचे अंग आहे. नियातकालीके हा ताज्या माहितीचा प्रवाह असतो. त्यामध्ये आद्ययावत माहिती मिळते. ही माहिती आमच्या विद्यार्थी व शिक्षकांना मिळावी म्हणून ग्रंथालयात वेगवेगळया विषयावरील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील इंग्रजी, मराठी व हिंदी भाषेतील एकूण १०० नियतकालिके आणि जर्नल्स खरेदी केली जातात. शैक्षणिक वर्षात ६००० ऑनलाईन ई-जर्नल्स आणि ३१३५००० ई-बुक्स चे दरवर्षी नूतनीकरण करून ग्रंथालय सभासदांना उपलब्द करून देण्यात येते. प्रिंट आणि ई-जर्नल्स आणि ई-बुक्स ई. करिता वर्षभरासाठी वार्षिक वर्गणी स्वरूपात वर्गणी पाठवली जाते.

**दैनिक :** शिक्षक व विद्यार्थी यांना दररोजच्या घडामोडीची माहिती मिळावी या करिता मराठी, इंग्रजी आणि हिंदी भाषेतील २० दैनिक वर्तमान पेपर ग्रंथालय विभागात उपलब्ध करून देण्यात आली. त्यासाठी दरमहा रु. ३००० (तीन हजार पाचशे रुपये) एवढा खर्च केला जातो.

**झेरॉक्स सेवा** : संशोधक विद्यार्थी व महाविद्यालयीन कर्मचारी यांच्या मागणी नुसार संदर्भग्रंथ तसेच नियतकालिकातील मजकूराच्या प्रतिलिपी काढून दिल्या जातात.

**कात्रण सेवा** : महाविद्यालयाची प्रतिमा अधिक स्पष्ट होण्यासाठी ग्रंथालय विभागातून महाविध्यालयात राबविलेल्या उपक्रमांची माहिती किवां माहितीच्या स्वरूपातील बातमी प्रसिद्ध केली जाते. त्या प्रसिद्ध बातमीचे कात्रण सर्वांसाठी वाचावयास उपलब्ध करून दिले आहे.

**फेसबुक सेवा / वाट्सअप** : सोशल नेट्वर्किंगच्या माध्यमातून महाविद्यालात विविध शैक्षणिक उपक्रम आयोजित केली जातात. त्या सर्व उपक्रमाची माहिती व माहितीविषयक बातमी महाविद्यालायाच्या सोशल नेट्वर्किंग च्या माध्यमातून फेसबुकवर आणि **वाट्सअप वर** अपलोड केली जाते. जेणेकरून महाविद्यायालयाची प्रतिमा अधिक स्पष्ट होण्यास मदत होते.

**आंतर ग्रंथालयीन देवघेव सेवा :** महाविद्यालायातील विद्यार्थी व प्राध्यापकांना आपल्या विषयासंबधी पुस्तक ग्रंथालयात उपलब्द नसेल अशा वेळी खालील ग्रंथालयाचे सभासदत्व घेण्यात आले आहे.

१. डेलनेट (डेव्हलोपिंग लायब्ररी नेटवर्क ) चे सभासद, दिल्ली.

२. महात्मा गांधी विद्यामंदीर फार्मसी महाविद्यालय, नाशिक

३. महात्मा गांधी विद्यामंदीर मैनेजमेंट इन्स्टिटयुट, मुंबई आग्रा रोड पंचवटी नाशिक

४. महात्मा गांधी विद्यामंदीर संचलित कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सुरगाणा

**ग्रंथालयाची सुरक्षितता** : ग्रंथालय विभागातील साहित्य सुरक्षिततेच्या दृष्टीने ग्रंथालय बिभागाचा बासस्ट लाख रुपये चा विमाचे नूतनीकरण करण्यासाठी वार्षिक प्रीमियमपोटी ३००० रू. खर्च करण्यात आली.

**देणगी निधी :** यावर्षी भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालय, केंद्रीय हिंदी निदेशालय, नवी दिल्ली यांच्याकडून २०० पुस्तके भेट स्वरूपात मिळाली. आपणा सर्वांचे महाविद्यालयाच्या वतीने व ग्रंथालय विभागाच्या वतीने शतशः आभार!

| अं.न. | वाढदिवसानिमित्त ग्रंथ भेट दिलेल्या मान्यवर व्यक्तींची नावे | एकूण किमंतीचे ग्रंथ |
|---|---|---|
| १ | डॉ. जनार्धन महारु शेवाळे | २०००.०० |
| २ | | |
| | | |

**आभार :** महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातील सेवा व सुविधा समृद्ध व अद्ययावत करण्यासाठी संस्थेचे विशवस्त व अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य मा. बापूसाहेब जगदाळे व ग्रंथालय समितीचे सदस्य व माझे सर्व सहकारी आणि विद्यार्थी यांच्या सर्वांच्या मार्गदर्शनामुळे व सहकार्याने ग्रंथालयाची प्रगती होत आहे. मनापासून सर्वांचे आभार व्यक्त करतो.

Achievements:

Mr. Sambhaji P. Vyalij

1) Attended One Days International Level Conference on "**Application of ICT in Academic Libraries"** held at K. J. Somaiya College of Arts, Commerce and Science, Kopargaon 25th February 2018.

ग्रंथालय विभाग प्रमुख


## ग्रंथालय समिती

| अं. न. | ग्रंथालय समिती सदस्य | |
|---|---|---|
| १. | प्राचार्य डॉ. बापूसाहेब एस. जगदाळे | अध्यक्ष |
| २. | उपप्राचार्य डॉ. रविंद्र एस. देवरे | सदस्य |
| ३. | उपप्राचार्या डॉ. एम. अे. भारद्वाज | सदस्य |
| ४. | प्रा. डॉ. टी. आर. महाले | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ५. | प्रा. डॉ. विनीत एच. रकिबे | सदस्य |
| ६. | प्रा. डॉ. के. एन. पिंगळे | सदस्य |
| ७. | प्रा. एस. पी. व्याळीज | सचिव |
| ८. | श्री. एस. एन. शेलार | सदस्य |



ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांचे जयंती साजरी करण्यात आली त्या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे समवेत महाविद्यालयचे ग्रंथपाल प्रा. एस. पी. व्याळीज, कला व वाणिज्य शाखा प्रमुख डॉ. विनीत रकिबे, मराठी विभाग प्रमुख डॉ. किरण पिंगळे, ग्रंथालय कर्मचारी व विद्यार्थी.



ग्रंथालय विभागाला सदिच्छा भेटी दरम्यान मा. डॉ. राजेंद्र कुंभार आणि डॉ. सदानंद बनसोडे, मा. डॉ. भाऊसाहेब पानगे (सा.फु. पुणे विद्यापीठ, पुणे)) यांच्या समवेत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूसाहेब एस. जगदाळे, ग्रंथपाल प्रा. एस. पी. व्याळीज आदि सह ग्रंथालय कर्मचारी.



ग्रंथालय विभागाला सदिच्छा भेटी दरम्यान प्रा. डॉ. मून हाय किम - दक्षिण कोरिया, प्रा. डॉ. पंकज कोईनकर - जपान यांच्या समवेत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूसाहेब एस. जगदाळे, ग्रंथपाल प्रा. एस. पी. व्याळीज आदि सह ग्रंथालय कर्मचारी.



ग्रंथालय विभागाला सदिच्छा भेटी दरम्यान प्रा. डॉ. मून हाय किम - दक्षिण कोरिया, प्रा. डॉ. पंकज कोईनकर - जपान यांच्या समवेत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूसाहेब एस. जगदाळे, ग्रंथपाल प्रा. एस. पी. व्याळीज आदि सह ग्रंथालय कर्मचारी.

---

## प्रसिद्धी समिती :

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रसिद्धी समितीने महाविद्यालया संदर्भात वर्ष भरात झालेल्या विविध उपक्रमांच्या बातम्या विविध वर्तमानपत्रातून प्रसिद्धी दिली. असुन त्या संदर्भातील काही बातम्या आपल्या अवलोकनार्थ जोडलेल्या आहेत.

प्रा. एस .पी. व्याळीज

# हिरे महाविद्यालयात युवक भूषण स्पर्धा उत्साहात




**पंचवटी :** लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात युवक बिरादरी संस्था अंतर्गत युवक भूषण - २०१७ परीक्षा सोमवारी (दि. १८) घेण्यात आली. यात १०७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सामान्य ज्ञान, चालू घडामोडी, देश-विदेशातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आदींबाबत २०० प्रश्नांचा समावेश या प्रश्नावलीत होता.

प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे यांनी आजच्या युगातील स्पर्धेचे महत्त्व अधोरेखित केले. महाविद्यालयीन जीवनातून बाहेर पडल्यानंतर विद्यार्थ्यांना पावलोपावली अनेक स्पर्धांना तोंड द्यावे लागते. याची पूर्वतयारी म्हणून अशा स्पर्धा परीक्षांचे आयोजन केले जात असल्याचे यावेळी प्रा. डॉ. जगदाळे यांनी सांगितले. युवक बिरादरीचे समन्वयक प्रसन्न पाटील यांनी संस्थेची ध्येय धोरणे व उद्देश स्पष्ट केला.

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक डॉ. किरण पिंगळे, महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. मृणाल भारद्वाज, उपप्राचार्य डॉ. रवींद्र देवरे, विज्ञान शाखाप्रमुख डॉ. तुकाराम महाले, कला व वाणिज्य शाखाप्रमुख डॉ. विनित रकिबे यांची प्रमुख उपस्थिती होती.



**पंचवटी : पंचवटी महाविद्यालयाचा रोइंगपटू संतोष कडाळे यास त्याचे मार्गदर्शक अंबादास तांबे यांच्यासह महाविद्यालयातर्फे गौरविण्यात आले. या वेळी प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे, मृणाल भारद्वाज आदी.**

# शिवछत्रपती पुरस्कारविजेत्यांचा पंचवटी महाविद्यालयात गौरव

पंचवटी, ता. १५ : नुकत्याच जाहीर झालेल्या शिवछत्रपती पुरस्काराचा मानकरी ठरलेला महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित लोकनेते व्यंकटराव हिरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील तृतीय वर्ष कला शाखेचा विद्यार्थी संतोष छगनराव कडाळे (रोइंग) व त्याचे मार्गदर्शक अंबादास तांबे यांचा बुधवारी (ता. १४) महाविद्यालयातर्फे सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे यांनी संतोषचे मार्गदर्शक श्री. तांबे यांच्यासह संतोषचा शाल, पदक आणि गुच्छ देऊन सत्कार केला. गुरु-शिष्याच्या भावी वाटचालीला शुभेच्छा दिल्या. पुरस्काराचे वितरण शनिवारी (ता. १७) होणार आहे. याप्रसंगी नाशिकमध्ये झालेल्या महापौर करंडक राज्यस्तरीय जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत एक सुवर्ण व दोन कांस्यपदक पटकावणाऱ्या पवन सोनवणे व कांस्यपदक पटकावणाऱ्या रितेश सोनवणे यांचाही सत्कार झाला.

पुढारी

# खेळामुळे सकारात्मक ऊर्जा मिळण्यास मदत: डॉ. सिंगल

**पंचवटी : वार्ताहर**

खेळामुळे सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच खेळालादेखील महत्त्व देण्याची गरज आहे, असे प्रतिपादन पोलीस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांनी केले.

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. महाविद्यालयात दरवर्षी पंचवटी परिसरातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तीस पंचवटी रत्न पुरस्काराने सन्मानित केले जाते. या वर्षीचा हा पुरस्कार नाशिकचे जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक यांना प्रदान करण्यात आला. प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे हे अध्यक्षस्थानी होते. कार्यालयीन विभागाचे स्नेहसंमेलनाध्यक्ष गंगाधर बोंबले हे प्रदीर्घ सेवेतून निवृत्त झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यापीठ निवडणुकांमध्ये निवडून आलेल्या सिनेट व अभ्यास मंडळाच्या सर्व सदस्यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

विज्ञान शाखाप्रमुख डॉ. तुकाराम महाले यांनी प्रास्ताविक केले. कला व वाणिज्य शाखाप्रमुख डॉ. विनीत रकिबे यांनी परिचय करून दिला. कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. रवींद्र देवरे, उपप्राचार्या डॉ. मृणाल भारद्वाज, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. पी. डी. झाल्टे, उपप्राचार्य प्रा. जे. एन. सोनवणे, पर्यवेक्षिका प्रा. सुचेता सोनवणे आदी उपस्थित होते. प्रा. किशोर निकम व प्रा. प्रगती मारकवार यांनी सूत्रसंचालन केले. पारितोषिक वितरणाचे वाचन प्रा. संभाजी व्याळीज यांनी केले. विद्यापीठ प्रतिनिधी चेतन खैरनार याने आभार मानले.



**पंचवटी : पारितोषिक प्रदान करताना डॉ. रवींद्रकुमार सिंगल व व्यासपीठावर रवींद्र नाईक, सुनील पुजारी, डॉ. बापूसाहेब जगदाळे, डॉ. रवींद्र देवरे, डॉ. मृणाल भारद्वाज आदी.** (छाया : देवानंद बैरागी)



पुढारी

# हिरे महाविद्यालयातील मेळाव्यात ९३ विद्यार्थ्यांना मिळाला रोजगार

## लातूरसिंग वर्मा : व्यावसायिक कौशल्य असणाऱ्यांची उणीव





**पंचवटी : रोजगार मेळाव्यात बोलताना प्राचार्य जगदाळे. दुसऱ्या छायाचित्रात विद्यार्थी.** (छाया : देवानंद बैरागी)

**पंचवटी : वार्ताहर**

स्वयंरोजगार आणि उद्योग व्यवसायामध्ये कौशल्य असलेल्या उमेदवारांची उणीव असून, विद्यार्थ्यांनी रोजगार मेळावा या संधीचा फायदा करून घ्यावा, असे आवाहन आईसेक्ट- एनएस डीसीचे दक्षिण विभागाचे समन्वयक लातूरसिंग वर्मा यांनी व्यक्त केले. हिरे महाविद्यालयात आयोजित रोजगार मेळाव्यात ते बोलत होते. या मेळाव्यामध्ये मुलाखतीसाठी ३५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. त्यापैकी प्राथमिक फेरीसाठी ९३ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे नाशिक कार्यालय आणि हिरे महाविद्यालयाच्या करिअर कौन्सिलिंग आणि प्लेसमेंट सेल अंतर्गत मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी वर्मा म्हणाले, प्रत्येकाला नोकरी देणे शासनाला शक्य नाही. खासगी क्षेत्रातील आईसेक्ट- एनएसडीसीच्या अंतर्गत अनेक विविध कंपन्यांमध्ये रोजगार उपलब्ध होऊ शकतो.

मेळाव्यात डाटा मेट्रिक्स, नाशिक, युरेका फोर्बेस, डब्ल्यूएनएस ग्लोबल सर्व्हिसेस, डीएचआर सर्व्हिसेस, नेक्सटेपन, बडोदरा, कोहिनूर टेक्निकल इन्स्टिट्यूट, आयडीबीआय बँक नाशिक अशा विविध कंपन्यांनी सहभाग घेतला.

प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे यांनी स्वागत केले. मेळावा समन्वयक भूषण भालेराव यांनी मार्गदर्शन केले. राज्य प्रमुख बिनीस कुमार, उपप्राचार्या व प्लेसमेंट सेलच्या प्रमुख डॉ. मृणाल भारद्वाज, उपप्राचार्य डॉ. रवींद्र देवरे, डॉ. टी. आर. महाले. डॉ. विनीत रकिबे यांचे मार्गदर्शन लाभले.

प्लेसमेंट सेलचे समन्वयक प्रा. अनिल बी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. सादिक अली यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. सविता पिंगळे यांनी आभार मानले. याप्रसंगी करिअर कौन्सलिंग प्लेसमेंट सेल समिती सदस्य प्रा. एस. पी. व्याळीज, प्रा. शीना मांजरेकर, शाहरुख शेख, राजेश बेदमुथा, नरेंद्र राजगुरू, विद्या बर्वे, शीतल सोनवणे आदी मान्यवरांसह विद्यार्थी उपस्थित होते.




# मोठी स्वप्ने पहा : वायुनंदन

प्रतिनिधी । नाशिक

## विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना पदवीप्रदान

**महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या नाशिक जिल्ह्यातील कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, फार्मसी, हॉटेल मॅनेजमेंट, मॅनेजमेन्ट अँन्ड कॉम्प्युटर सायन्स, इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च आणि शिक्षणशास्त्र महाविद्यालय अशा विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आल्या.**

जीवनात प्रगतीचे शिखर गाठण्यासाठी प्रत्येकाने मोठी स्वप्ने पाहिली पाहिजे. जिद्द व चिकाटीच्या जोरावर प्रयत्न करून स्वप्न पूर्ण केली पाहिजे. ध्येय निश्चित करून त्या दिशेने वाटचाल करत राहिल्यास यशस्वी होता येते. त्यासाठी प्रयत्न करत राहिले पाहिजे, असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. इ. वायुनंदन यांनी येथे केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या विविध महाविद्यालयांचा तृतीय पदवी ग्रहण सोहळा आरोग्य विज्ञान विद्यापीठात पार पडला. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी त्यांनी सांगितले की, कोणत्याही विद्याशाखेतील संशोधन हे समाजोपयोगी व राष्ट्राच्या उपयोगसाठी असावे. मोबाइलचा प्रभाव व त्याचे दुष्परिणाम सांगून मोबाइलचा वापर चांगल्या कामासाठी विद्यार्थ्यांना करावा, असेही ते म्हणाले. यावेळी संस्थेचे समन्वयक आमदार डॉ. अपूर्व हिरे यांनी संस्थेची माहितीचे विवेचन केले. कार्यक्रमाची सुरुवात मिरवणुकीने झाली. विद्यापीठ गीताने उद्घाटन झाले. कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. व्ही. एस. मोरे यांनी केली. पदवी प्रमाणपत्र वितरणासाठी प्रा. दिप्ती भुतडा यांनी अध्यक्षाना प्रार्थना केली. प्रा. मीनाक्षी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. याप्रसंगी व्यासपीठावर डॉ. एन. बी. पवार, डॉ. देशमुख, डॉ. चंद्रशेखर पवार, प्राचार्य डॉ. संतोष तांबे, विश्वस्त राजेश शिंदे, सुजाता शिंदे, श्याम भंडारी आदी मान्यवरासह संस्थेचे पदाधिकारी विविध महाविद्यालयातील प्राचार्य, उपप्राचार्य, विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी आदींसह मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे यांनी आभार मानले.

# खेळांतून मिळते सकारात्मक ऊर्जा

## पोलिस आयुक्त डॉ. रवींद्र सिंगल यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । नाशिक



वार्षिक पारितोषिक वितरण सोहळ्यात विद्यार्थ्यांचा गौरव करताना सिंगल.

खेळामुळे शारीरिक स्वास्थ्याबरोबरच मानसिक आरोग्यही सुदृढ राहते. माणूस म्हणून जडणघडण होत असताना आयुष्याबद्दलची सकारात्मक ऊर्जा खेळाडूवृत्तीतूनच विकसित होत असते. सोशल मीडियाच्या विळख्यात अडकलेल्या तरुणाईला केवळ खेळच बाहेर काढू शकतो. इंटरनेटचा वापर हा फक्त मनोरंजनासाठी न करता विधायक बाबींसाठी करावा. प्रत्येकाने स्वतःला शिस्त लावून घ्यावी. कायद्याचे व नियमांचे उल्लंघन होणार नाही, असे वर्तन करू नये, असे प्रतिपादन पोलिस आयुक्त डॉ. रवींद्र सिंगल यांनी केले.

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित पंचवटी महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख अतिथी म्हणून सिंगल बोलत होते. याप्रसंगी प्रा. के. एन. पाटील, उपप्राचार्य डॉ. रवींद्र देवरे, उपप्राचार्या डॉ. मृणाल भारद्वाज, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. पी. डी. झाल्से, उपप्राचार्य प्रा. जे. एन. सोनवणे, पर्यवेक्षिका प्रा. सुचता सोनवणे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे यांनी या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयाने केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा आढावा घेतला.

प्रदीर्घ सेवेतून निवृत्त झालेल्या कार्यालयीन विभागाचे स्नेहसंमेलनाध्यक्ष गंगाधर बोंबले यांचाही सोहळ्यादरम्यान मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच, विद्यापीठ निवडणुकांमध्ये निवडून आलेल्या सिनेट व अभ्यास मंडळाच्या सर्व सदस्यांचाही याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

विज्ञान शाखाप्रमुख डॉ. तुकाराम महाले यांनी सविस्तर अहवाल वाचन केले. कला व वाणिज्य शाखाप्रमुख डॉ. विनीत रकिबे यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. किशोर निकम व प्रा. प्रगती मारकवार यांनी केले. पारितोषिक वितरणाचे वाचन प्रा. संभाजी व्याळीज यांनी केले. विद्यापीठ प्रतिनिधी चेतन खैरनार याने आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### जिल्हा क्रीडा अधिकारी नाईक यांना 'पंचवटी रत्न पुरस्कार'

**महाविद्यालयाच्या वतीने दरवर्षी पंचवटी परिसरातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तीस 'पंचवटी रत्न पुरस्काराने' सन्मानित केले जाते. या वर्षीचा हा पुरस्कार नाशिकचे जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक यांना प्रदान करण्यात आला. या पुरस्काराप्रसंगी उत्तर देताना त्यांनी खेळाचे महत्व अधोरेखित केले.**



आईसेक्ट-एनएसडीसीच्या वतीने हिरे महाविद्यालयात आयोजित रोजगार मेळाव्याप्रसंगी उपस्थित विद्यार्थी.

**संधी** | आईसेक्ट-एनएसडीसीतर्फे हिरे महाविद्यालयात उपक्रमाचे आयोजन

# रोजगार मेळाव्यातून ९३ विद्यार्थ्यांची निवड

प्रतिनिधी | नाशिक

विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी मिळावी, या उद्देशाने सरकारच्या कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, पंचवटी महाविद्यालयातील प्लेसमेंट सेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रोजगार मेळाव्याला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या मेळाव्यात आयटी क्षेत्रातील नामवंत कंपन्यांसह बँकिंग व औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांनी सहभागी होऊन विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. त्यात विद्यालयातील ९३ विद्यार्थ्यांची निवड झाली.

पंचवटी कॉलेजात आईसेक्ट-एनएसडीसीतर्फे युवा दिनानिमित्त रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यात डाटामेटिक्स, युरेका फोर्बेस, डब्ल्यू.एन.एस. ग्लोबल सर्व्हिसेस, डी.एच.आर. सर्व्हिसेस, नेक्सटेपन बडोदा, कोहिनूर टेक्निकल इन्स्टिट्यूट, आय.डी.बी.आय. बँक यांनी सहभाग घेतला होता. पदवी आणि पदव्युत्तर उमेदवारांच्या मेळाव्यातून मुलाखती घेण्यात आल्या. त्यात ३५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. त्यापैकी ९३ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

याप्रसंगी आईसेक्ट-एनएसडीसीच्या दक्षिण विभागाचे समन्वयक लातुरसिंग वर्मा यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मेळाव्याच्या आयोजनासाठी समन्वयक म्हणून आईसेक्ट-एन.एस.डी.सी. राज्याचे रोजगार समन्वयक भूषण भालेराव यांनीही मार्गदर्शन केले.

राज्यप्रमुख बिनीस कुमार, उपप्राचार्या व प्लेसमेंट सेलच्या प्रमुख डॉ. मृणाल भारद्वाज, उपप्राचार्य डॉ. रवींद्र देवरे, डॉ. टी आर. महाले. डॉ. विनीत रकिबे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्लेसमेंट सेलचे समन्वयक प्रा. अनिल बी. पाटील यांनी प्रास्ताविक आणि प्रमुख अतिथींचा परिचय करून दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सादिक अली यांनी केले आणि आभार प्रा. सविता पिंगळे यांनी मानले. याप्रसंगी प्रा. एस. पी. व्याळीज, प्रा. श्रीनाथ मांजरेकर, शाहरुख शेख, नरेंद्र राजगुरू, विद्या बर्वे, शीतल सोनवणे आदी मान्यवरांसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मनात न्यूनगंड ठेवू नये

**यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, विद्यार्थ्यांनी कुठलाही प्रकारचा न्यूनगंड मनात ठेवू नये आणि जास्तीत जास्त तरुण युवकांनी आणि युवतींनी मुलाखतीला सामोरे जावे.**

# जॉब फेस्टमध्ये ६३ जणांची निवड

म. टा. वृत्तसेवा, पंचवटी

लोकनेते व्यंकटराव हिरे कॉलेजमधील करिअर कॉन्सलिंग आणि प्लेसमेंट सेल आणि करिअर क्लब कन्सल्टंसी अण्ड मॅनेजमेंट सर्व्हिसेस यांच्यातर्फे झालेल्या जॉब फेस्ट २०१८ मध्ये नामांकित उद्योग समुहातील विविध क्षेत्रातील ४२ कंपन्यांनी ६३ जणांना रोजगारासाठी संधी उपलब्ध करून दिली.



मेळाव्यात नाशिकसह विविध जिल्ह्यातील अभियांत्रिकी, बीबीए, बीसीए, एमबीए, कला वाणिज्य, बी व्होकेशनल व विज्ञान शाखेतील पदवी व पदव्युत्तर तसेच आयटीआय डिप्लोमा, बी व्होकेशनल या विषयातील उपलब्ध असलेल्या विविध नोकरीच्या संधीसाठी मुलाखती घेण्यात आल्या. त्यात ६७२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. २८९ उमेदवारांची प्रथम फेरीसाठी निवड करण्यात आली. यातील ६३ उमेदवारांची नियुक्ती झाली आहे.

कॉलेजचे प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे यांच्या अध्यक्षतेखाली आणि लघुउद्योग भारती नाशिकचे अध्यक्ष संजय महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले. मेळाव्यात नाशिक, औरंगाबाद, पुणे, मुंबई येथील एसएस ग्रुप, टाइम्स प्रो, धुमाळ इंडस्ट्रीज, पूजा इंडस्ट्रीज, यु ब्रॉडबँड, युरेका फोर्ब्स लिमिटेड, बी. कोड्स प्रा. लिमिटेड, डब्ल्यू एन. एस. ग्लोबल सी. एन. सी. वेबवर्ल्ड, जीवनदान, ऋषभ इन्स्ट्रमेंटन्स अशा ४२ कंपन्यांना सहभागी झाल्या. कंपन्यांच्या प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेऊन निवड प्रक्रिया पूर्ण केली. मुलाखती घेण्यासाठी आलेल्या कंपन्यांच्या प्रतिनिधींचा प्रिती पाटील यांनी परिचय करून दिला.



हिरे महाविद्यालयात 'इनोव्हेशन्स इन नॅनोमटेरिअल्स ॲण्ड देअर ॲप्लिकेशन्स' या विषयावर मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. इ. वायुनंदन. समवेत डॉ. अपूर्व हिरे, डॉ. व्ही. एस. मोरे, डॉ. मून हाय किम, डॉ. महंमद इद्रिस मिह, प्राचार्य डॉ. बापूसाहेब एस. जगदाळे, प्रा. डॉ. पंकज कोईनकर, प्राचार्य डॉ. संतोष तांबे, डॉ. रुपाली खैरे, डॉ. रवी देवरे, डॉ. मृणाल भारद्वाज, डॉ. टी. आर. महाले, डॉ. विनीत रकिबे, विद्यार्थी प्रतिनिधी चेतन खैरनार.

आंतरराष्ट्रीय परिषद | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे पंचवटी कॉलेजात आयोजन

# समाजोपयोगी ठरू शकणारे मूल्याधिष्ठित संशोधन उपयुक्त

## कुलगुरू डॉ. इ. वायुनंदन यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी | नाशिक

कोणतेही संशोधन हे मूलतः मूल्याधिष्ठित असायला हवे. संशोधनाचा दर्जा खालावत चालला असल्याने, चांगल्या दर्जाचे संशोधन होणे अपेक्षित आहे. त्यासाठी कोणत्याही विद्याशाखेतील संशोधन हे समाजोपयोगी व राष्ट्रपयोगी असावे, असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इ. वायुनंदन यांनी केले.

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे 'इनोव्हेशन्स इन नॅनो मटेरियल्स अँड देअर ॲप्लिकेशन्स' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. वायुनंदन बोलत होते. यावेळी महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे समन्वयक तथा आमदार डॉ. अपूर्व हिरे, प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे, समन्वयक डॉ. अरुण पाटील आदी उपस्थित होते. यावेळी डॉ. अपूर्व हिरे यांनी उच्च शिक्षणात होत असलेल्या बदलांचा मागोवा घेतला. तसेच, पुढील काळात ग्रामीण आणि दुर्गम भागातील महाविद्यालयांत अद्ययावत संशोधन केंद्र उभारणार असल्याचेही ते म्हणाले.

प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे यांनी देश-विदेशांतून आलेल्या सर्व संशोधक, मार्गदर्शकांचे स्वागत केले. समन्वयक डॉ. अरुण पाटील यांनी प्रमुख अतिथींचा परिचय करून दिला. यावेळी संस्थेचे सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे, प्राचार्य डॉ. संतोष तांबे, डॉ. रूपाली खैरे, उपप्राचार्य डॉ. रवींद्र देवरे, उपप्राचार्या डॉ. मृणाल भारद्वाज, कला व वाणिज्य शाखाप्रमुख डॉ. विनीत रकिबे, विद्यार्थी प्रतिनिधी चेतन खैरनार यांच्यासह संशोधक विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. किशोर निकम यांनी केले. चर्चासत्राचे संयोजक व विज्ञान शाखाप्रमुख डॉ. तुकाराम महाले यांनी आभार मानले.

### पाच देशांतील ११४ शोधनिबंधांचे सादरीकरण

या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रासाठी देश-विदेशांतून एकूण ११४ शोधनिबंध सादर झाले असून, त्यांचा समावेश असलेल्या शोधपत्रिकेतेचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. गणित विभागातील विद्यार्थ्यांनी डॉ. ए. पी. भदाणे यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेल्या ६०० शोधनिबंध असलेल्या प्रबंधाचेही प्रकाशन यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पाच देशांतील तज्ज्ञांनी यात सहभाग घेतला होता. चर्चासत्रासाठी प्रा. डॉ. मून हाय किम (दक्षिण कोरिया), प्रा. डॉ. पंकज कोईनकर (जपान), डॉ. लिडिया रहेमान (मॉरिशस), डॉ. इ. च्यु. च्युंग (मलेशिया), डॉ. महंमद इद्रिस मिह (बांगलादेश), डॉ. बी. बी. नाथ (पुणे विद्यापीठ), डॉ. एम. ए. मोरे (पुणे विद्यापीठ), डॉ. खडगुजर आदी उपस्थित होते.



# हिरे महाविद्यालय

पंचवटी : लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयाच्या प्रांगणात आ. डॉ. अपूर्व हिरे यांच्याहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणापूर्वी डॉ. हिरे यांनी राष्ट्रीय छात्रसेनेच्या कवायतीचे निरीक्षण करीत एनसीसीप्रमुख प्रा. सचिन सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली छात्र सेनेच्या पथकाने राष्ट्रध्वजाला सलामी देत शानदार संचलन केले. याप्रसंगी संस्थेचे सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे, प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे, हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड केटरिंग महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जाधव, फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष तांबे, दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय भावसार, समन्वयक प्रा. चंद्रशेखर पवार, समन्वयक डॉ. प्रदीप, अशोक हिरे, संचालिका रुपाली खैरे, उपप्राचार्या मृणाल भारद्वाज, सायन्स विभागप्रमुख डॉ. टी. आर. महाले, उपप्राचार्य पी. डी. झालसे, उपप्राचार्य जे. एन. सोनवणे आदी उपस्थित होते.

पुढारी

# एड्सबाधित मुलांनी लुटला नाताळाचा आनंद

**नाशिक : प्रतिनिधी**

लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी यश फाउंडेशनचे अध्यक्ष रवि पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एड्सबाधित मुलांसमवेत नाताळ सण साजरा केला.

यश फाउंडेशन आणि महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम घेण्यात आला. यावेळी पाटील म्हणाले, मुलांसमवेत माणुसकीचे नाते जपत हा सण साजरा करण्यात आला. प्रत्येक व्यक्तीला जीवन जगण्याचा अधिकार आहे.



नाशिक : एचआयव्ही एड्सबाधित मुलांसमवेत नाताळ साजरा करताना पंचवटी महाविद्यालयाचे विद्यार्थी.

आपण किती जगलो, यापेक्षा कसे जगलो याला महत्त्व आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या जीवनातील प्रत्येक दिवसाचा मनमुराद आनंद लुटावा, असे आवाहन पाटील यांनी केले.

यावेळी सांताक्लॉजच्या वेशभुषेत आलेल्या विद्यार्थ्यांनि या चिमुकल्यांना विविध भेटवस्तू दिल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहिला. याप्रसंगी राणी गायकवाड, अर्जुन कमानकर, मनोज जगताप, अविनाश पाटील अर्चना कडाळे, स्वाती त्रिभुवन, जयश्री कोळवणे, विक्रांत शर्मा यांच्यासह पंचवटी महाविद्यालयाचे इतर विद्यार्थी उपस्थित होते.

My Nashik
Page No. 02 Dec 29, 2017
Powered by: erelego.com

नाशिक स्कॅन



सामाजिक जाणीव | विद्यार्थ्यांच्या माध्यमातून जनजागृतीसाठी यश फाऊंडेशनचा उपक्रम

# एचआयव्ही जागृती पथनाट्य स्पर्धेत पंचवटी कॉलेज प्रथम

**यांना मिळाले पारितोषिक-**

- प्रथम - लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालय, पंचवटी
- द्वितीय - आदर्श अध्यापन विद्यालय, सीबीएस
- तृतीय - जी.डी.सावंत महाविद्यालय पाथर्डी फाटा
- उत्तेजनार्थ - बिटको महाविद्यालय, नाशिकरोड
- उत्तेजनार्थ - कॉलेज ऑफ सोशल वर्क, गंगापूर रोड

# स्वामी विवेकानंद माध्यमिक शाळेचे यश



**विचारधारा** | हिरे महाविद्यालयात गांधी विचार संस्कार परीक्षेचे आयोजन

# गांधी विचार संस्कार परीक्षेत रुपाली वालेकरला सुवर्ण

**प्रतिनिधी । नाशिक**



महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात जळगाव येथील गांधी रिसर्च फाउंडेशन आणि गांधीयन स्टडीज सेंटर इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने गांधी विचार संस्कार परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. त्यात महाविद्यालयातील ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. या परीक्षेत बारावीतील विद्यार्थिनी रुपाली वालेकर हिने प्रथम क्रमांक मिळवत सुवर्ण पदक पटकावले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एस. जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली या परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. गांधीयन स्टडीज सेंटरच्या समन्वयिका प्रा. प्रगती मारकवार यांनी परीक्षेचे स्वरूप तसेच गांधीयन स्टडीज सेंटरमार्फत आयोजित विविध उपक्रमांची यावेळी माहिती दिली. या परीक्षेसाठी गांधीयन स्टडीज सेंटरचे सदस्य डॉ. नीलकंठ पाटील, डॉ. नारायण गाढे, प्रा. किशोर निकम, डॉ. किरण पिंगळे, डॉ. संतोष चोबे व प्रोजेक्ट फेलो प्रा. गोपाल मोजाड यांचे मोलाचे सहकार्य लाभले. पर्यवेक्षक म्हणून प्रा. कमलाकर भामरे, प्रा. कीर्ती पगार, प्रा. भागवत पगार यांनी काम बघितले. यावेळी सहभागी विद्यार्थ्यांना व विजेत्यांना उपप्राचार्य डॉ. आर. एस. देवरे, डॉ. मृणाल भारद्वाज, विज्ञान शाखा प्रमुख डॉ. टी. आर. महाले, कला व वाणिज्य शाखा प्रमुख डॉ. विनित रकिबे, प्रा. झाल्से, प्रा. सुचिता सोनवणे यांसह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

पुढारी

# हिरे महाविद्यालयात ग्रुप-डे साजरा



पंचवटी : वार्ताहर

महात्मा गांधी विद्या मंदिर संचालित, लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात ग्रुप-डे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयीन विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी धम्माल केली. अनेक ग्रुपने डोक्याला फेटे, एकाच कलरचे टी-शर्ट, एकाच कलरच्या साड्या, गांधी टोप्या असा पेहराव केला होता. यावेळी जनरल सेक्रेटरी चेतन खैरनार, ज्ञानेश्वर आमटे, अजय राठोड, युवराज जाधव, रोहिदास ढोन्नर, राणी गायकवाड, गणेश सानप, किरण लाटे, राकेश गावित आदींसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पंचवटी : ग्रुप-डे साजरा करताना लोकनेते हिरे महाविद्यालयाचे विद्यार्थी. (छाया : देवानंद बैरागी)

My Nashik
Page No. 03 Feb 07, 2018
Powered by: erelego.com



# मूल्याधिष्ठित संशोधनच राष्ट्रोपयोगी

## डॉ. ई. वायुनंदन : हिरे महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय चर्चासत्र

# रिटेलिंग क्षेत्रात नोकरीच्या असंख्य संधी



हिरे महाविद्यालयात आयोजित राज्यस्तरीय चर्चासत्राप्रसंगी शोधनिबंध पुस्तिकेचे प्रकाशन करताना मान्यवर.

## लोकनेते व्यंकटराव हिरे कॉलेजातील चर्चासत्रात डॉ. खैरे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी | नाशिक

रिटेलिंग ही संकल्पना नसून २१ व्या शतकातील महत्वपूर्ण क्रांतीच आहे. रिटेलिंग क्षेत्र वेगाने विस्तारत असल्याने या क्षेत्रात विद्यार्थ्यांसाठी नोकरीच्या असंख्य संधी उपलब्ध होणार असल्याचे प्रतिपादन आवाहन डॉ. रुपाली खैरे यांनी केले.

लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालय व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने 'रिटेलिंग ट्रेंड इन इंडिया : संधी व आव्हाने' विषयावर दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्राचे उद्घाटन एमबीए कॉलेजच्या संचालिका डॉ. रुपाली खैरे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या वेळी त्या बोलत होत्या. भुसावळचे प्राचार्य डॉ. अरविंद चौधरी, बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वाणिज्य विभागातील प्रा. डॉ. विलास इप्पर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जगदाळे यांनी या क्षेत्रात करिअर करण्याची इच्छा असणाऱ्या युवकांना विविध आव्हाने स्वीकारण्याची क्षमता अंगी बाणवावी लागेल, असे सांगितले.

या क्षेत्रासाठी लागणारे तांत्रिक कौशल्य, मानसिक क्षमता संबंधित युवकांकडे आहे किंवा नाही हे पडताळून त्यांची क्षमता वाढविणे गरजेचे आहे. त्यासाठी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दहावीपासून या क्षेत्राचे ज्ञान असावे. त्यासाठी त्या स्तरावरील कार्य गरजेचे आहे. विद्यालयांनीही रिटेलिंग आणि मार्केटिंग विषयाचे ज्ञान दिले पाहिजे. त्यासाठी प्रयत्न झाले पाहिजे, असे त्यांनी यावेळी सांगितले. या वेळी मान्यवरांच्या हस्ते "रिसर्च जर्नी' या शोधनिबंध पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

चर्चासत्राचे समन्वयक डॉ. के. टी. खैरनार यांनी चर्चासत्राची संकल्पना विषद केली. प्रमुख पाहुण्यांचा परिचय वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. एस. डी. खैरनार यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. डी. एस. शिंदे यांनी केले. वाणिज्य व कला शाखा प्रमुख डॉ. विनीत रकिबे यांनी आभार मानले. या प्रसंगी उपप्राचार्या डॉ. मृणाल भारद्वाज, उपप्राचार्य डॉ. रवी देवरे, प्रा. दीपाली चंद्रमोरे, प्रा. सोनल शिंदे, तसेच विविध महाविद्यालयातील प्राध्यापक, महाविद्यालयातील विभाग प्रमुख प्राध्यापक आदींसह विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**कार्यशाळा** | विभागीय आविष्कार प्रकल्प स्पर्धेत निवड झालेल्या विद्यार्थ्यांसाठी पुणे विद्यापीठाकडून मार्गदर्शन

# नावीन्यपूर्ण संशोधन प्रकल्पास पुणे विद्यापीठाकडून फेलोशिप

**पंचवटी महाविद्यालयात विशेष उपक्रमाचे आयोजन**

प्रतिनिधी | नाशिक

विद्यार्थ्यांमधील संशोधनवृत्तीला चालना मिळावी या उद्देशाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून घेण्यात येणाऱ्या आविष्कार स्पर्धेत अभिनव, नाविन्यपूर्ण आणि उच्च दर्जाचे संशोधन प्रकल्प सादर केल्यास अशा प्रकल्पांना विद्यापीठाकडून संशोधन फेलोशीप देण्यात येणार असल्याची माहिती विद्यापीठाच्या संशोधन विभागाचे समन्वयक डॉ. रवींद्र जायभावे यांनी माहिती दिली.

विभागीय स्तरावर निवड झालेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय आविष्कार प्रकल्प कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. जायभावे यांचे प्रमुख उपस्थित पार पडले. यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी उपप्राचार्या डॉ. मृणाल भारद्वाज, विषय तज्ज्ञ म्हणून डॉ. गंभीर, डॉ. एस. एल. लाव्हरे, डॉ. ओ. व्ही बोराडे, डॉ. रुपाली खैरे, डॉ. एस. जी. औटी, डॉ. प्रमोद हिरे, डॉ. एस. के. महाजन, डॉ. एम. ओ. भारद्वाज, डॉ. कैलास चंद्रात्रे, डॉ. महेश डी. औटी, डॉ. विनीत रकिबे, डॉ. संतोष चोथे आदी मान्यवरांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा घेण्यात आली. यात सहभागी विद्यार्थ्यांनी आपले संशोधन प्रकल्प सादर केले. यावेळी मान्यवर विषयतज्ज्ञ यांनी प्रकल्पाविषयी अडचणी जाणून घेतल्या व त्यावर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेसाठी संस्थेचे महासचिव प्रशांत हिरे, समन्वयक डॉ. अपूर्व हिरे, अद्वय हिरे, सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे यांचे मार्गदर्शन लाभले.






एकदिवसीय आविष्कार प्रकल्प कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. रवींद्र जायभावे. व्यासपीठावर मान्यवर, तर समोर उपस्थित विद्यार्थी, प्राध्यापक.

**नाशिकमधून ८४ प्रकल्प विद्यापीठस्तरावर**

पुणे विद्यापीठातर्फे विभागीय स्तरावर घेण्यात आलेल्या आविष्कार स्पर्धेतून कृषी, फार्मसी व इंजिनिअरिंग, मॅनेजमेंट व कॉमर्स, विज्ञान या पाच विषयांमध्ये विद्यार्थ्यांनी आपले संशोधन प्रकल्प सादर केले होते. पहिल्या फेरीतून ८४ प्रकल्पांची निवड विद्यापीठ स्तरावरील स्पर्धेसाठी करण्यात आली असून, या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी या विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

# आंतरराष्ट्रीय खेळाडू संतोष कडाळेचा पंचवटी कॉलेजतर्फे गौरव



**संतोष कडाळेला ११ हजारांचा धनादेश देताना प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे. समवेत डॉ. रवी देवरे, डॉ. मृणाल भारद्वाज, डॉ. महाले, डॉ. रकिबे, प्रा. झालसे, प्रा. सोनवणे.**

प्रतिनिधी | नाशिक

लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयातील खेळाडू विद्यार्थी संतोष कडाळे याची आशियाई रोइंग स्पर्धेसाठी भारतीय रोइंग संघटनेमार्फत भारतीय संघात निवड करण्यात आली होती. या आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील सहभागाबद्दल त्याचा महाविद्यालयाच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

आशियाई स्पर्धेत रोईंगमध्ये प्रतिनिधित्व करणारा संतोष कडाळे हा नाशिक जिल्ह्याचा दुसराच खेळाडू आहे. या स्पर्धा ४ ते ८ सप्टेंबर बँकॉक (थायलंड) येथे पार पडल्या. अशाप्रकारच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभाग नोंदविल्याबद्दल संतोषचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. तो वॉटर एज बोटिंग क्लब येथे तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतो. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूसाहेब जगदाळे यांच्या हस्ते त्याला अकरा हजार रुपये व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.

यावेळी डॉ. रवी देवरे, डॉ. मृणाल भारद्वाज, डॉ. टी. आर. महाले, डॉ. विनीत रकिबे, प्रा. प्रकाश झालसे, प्रा. जे. एन सोनवणे, क्रीडा संचालक डॉ. संतोष पवार, प्रा. रोशनी गुजराथी, प्रा. किशोर राजगुरू यांसह प्राध्यापकवृंद उपस्थित होता.